# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९१३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्र.:- आरक्षण/ओ-२२/ 775

दिनांक : 16-6-15

## परिपत्रक

### विषय - पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशबाबत - शैक्षणिक वर्ष २०१५-१६

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक विभागामध्ये वेगवेगळ्या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देताना शासन आदेश, विद्यापीठ अध्यादेश १८१ यांची अंमलबजावणी करून खाली नमूद केलेल्या आरक्षणाच्या टक्केवारीनुसार प्रवेश देण्यात यावेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सर्वसाधारण (खुले) | OPEN | ५०% |
| २. | अनुसूचित जाती | S.C. | १३% |
| ३. | अनुसूचित जमाती | S.T. | ७% |
| ४. | विमुक्त जाती (अ) | DT-A | ३% |
| ५. | भटक्या जमाती (ब) | NT-B | २.५% |
| ६. | भटक्या जमाती (क) | NT-C | ३.५% |
| ७. | भटक्या जमाती (ड) | NT-D | २% |
| ८. | इतर मागास वर्ग | OBC | १९% |

१. शासन आदेशानुसार प्रवेशामध्ये अपंगासाठी ३ % जागा राखीव ठेवण्यात याव्यात.

२. गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २% पर्यंत विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

३. ज्या विषयात सर्व प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत नसतील तेथे आरक्षणामध्ये वर उल्लेख केलेल्या आरक्षण क्रमानुसार प्रथम अनु.जाती, अनु.जमाती, विजा (अ), भज (ब), (क), (ड), व इमाव या क्रमाने आरक्षण टक्केवारी विचारात घेवून जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

४. उपरोक्त आरक्षण हे विभागामध्ये अभ्यासक्रमनिहाय असेल, शैक्षणिक विभागामार्फत येणा-या बिगर राखीव जागा या प्रथमतः भरण्यात याव्यात. यामध्ये गुणवत्तेनुसार असणा-या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा देखील समावेश असेल. या विद्यार्थ्यांचा समावेश आरक्षणामध्ये करण्यात येवू नये, उर्वरित जागा आरक्षणानुसार भरण्यात याव्यात.

शैक्षणिक विभागात प्रवेश देताना एखाद्या प्रवर्गाचा उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांच्या इतर गटातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यामधून शासन निर्णयानुसार अंतर्गत बदलाने उमेदवारांना प्रवेश देवून आरक्षण पूर्ण करण्यात यावे.

५. महाराष्ट्र शासनाच्या आरक्षण धोरणानुसार क्रिमीलेअरचे तत्व, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती वगळता इतर सर्व प्रवर्गांना लागू राहील.

६. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवांराना आरक्षणाच्या कोणत्याही सवलती / फायदे प्राप्त होणार नाहीत.

७. ज्या शैक्षणिक विभागात द्वितीय वर्षासाठी स्पेशलायझेशननुसार प्रवेश देण्यात येतात त्या ठिकाणीही वरील आरक्षणाची टक्केवारी पाळणे आवश्यक आहे. स्पेशलायझेशननुसार प्रवेश देताना गुणवत्ता, पसंती व आरक्षण विचारात घेवून प्रवेश प्रक्रिया करण्यात यावी.

८. शैक्षणिक प्रवेशामध्ये ठेवावयाच्या आरक्षणासंदर्भात शासन निर्णय व त्या संबंधीचे परिपत्रक वेळोवेळी या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. प्रवेश प्रक्रिया करताना आरक्षण धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी.

प्रवेश समितीवर मागासवर्गीय शिक्षकास मागासवर्गीय प्रतिनिधी म्हणून बोलाविण्यात यावे. संदर्भासाठी मागासवर्गीय प्रतिनिधीची यादी सोबत जोडत आहे. आरक्षणाच्या नियमांच्या अधिक माहितीसाठी आवश्यकतेनुसार आरक्षण कक्षाशी संपर्क साधावा.

प्रवेश प्रक्रियेनंतर झालेल्या प्रवेशाची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

गणेशखिंड, पुणे ४११००७
संदर्भ- आरक्षण/ओ-२२/४२५
दिनांक- 16-6-15

प्रत :-
१) मा.विभाग प्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७
२) मा.आरक्षण प्रतिनिधी, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७
३) सहायक कुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ४११००७

Chandraroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

